# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ४०–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. मल्लू बाबू खोत,<br>रा. खोत मळा, तारदाळ, जि. कोल्हापूर | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, हातकणंगले, जि. कोल्हापूर | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. मल्लू बाबू खोत, रा. खोत मळा, तारदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी शेती वापरासाठी ५एचपी इतक्या जोडणीची आवश्यकता असल्याने दि. २१.२.२००६ रितसर अर्ज दाखल केला आहे. तथापि वीज जोडणी न मिळाल्याने प्रथमत: अंतर्गत कक्ष कोल्हापूर व नंतर कक्षाचा निर्णय मान्य न झाल्याने ग्राहक मंचात दि. १७.२.२०१० रोजी अर्ज दाखल केला आहे.

सदरचा अर्ज दाखल करुन घेवून मंचाने दि. १९.४.२०१० रोजी सुनावणीची तारीख निश्चित केली. तत्पूर्वी वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला तो प्राप्त झाल्याने निश्चित केल्याप्रमाणे दि. १९.४.२०१० मंच कार्यालयात सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्यावेळी श्री. मल्लू बाबू खोत यांच्या वतीने सातू बाबू खोत उपस्थित होते. तसेच वि.प.तर्फे सहाय्यक अभियंता, हातकणंगले श्री. निशाणदार व शाखा कार्यालयाचे कनिष्ठ अभियंता बांदिवडेकर व श्री. चव्हाण, कनिष्ठ अभियंता उपस्थित होते. तसेच मंडल कार्यालयातर्फे कार्यकारी अभियंता श्री. आडके उपस्थित होते.

ग्राहक तक्रारदाराचा अर्ज सोबतची कागदपत्रे वि.प.ची कार्यवाही व भूमिका अंतर्गत कक्षाचा निर्णय व सुनावणी दरम्यानची दाखल लेखी म्हणणे या आधारे तक्रारीचे स्वरुप व वि.प.ची भूमिका या आधारे मंच खालील निष्कर्षाप्रत पोहोचला आहे.

श्री. खोत यांनी शेती वीज पंपासाठी दि. २१.२.२००६ रोजी अर्ज केलेला आहे व कागदपत्रांची पूर्तता दि. १८.११.२००९ रोजी केलेली असल्याने त्वरित कनेक्शन मिळावे अशी अपेक्षा ग्राहकाचे व्यक्त केली. वीज जोडणीच्या विलंबाबद्दल भरपाई मागितली आहे तसेच जोडणीचा अर्ज मंजूर करावा, अंतर्गत कक्षाचा निर्णय रद्द करावा इ. मागण्या आपल्या मागणीपत्रात जोडल्या आहेत. त्यांस अनुसरुन वि.प.ने लाईन देण्याची व्यवस्था केलेली आहे, तथापि ज्या बाजूने सदरची जोडणी देण्यासाठी एलटी लाईन उभी केली आहे, त्याच बाजूच्या शेतकऱ्यांनी जयसिंगपूर येथील कोर्टात तक्रार दाखल करुन काम करण्यास अटकाव केलेला आहे, त्यामुळे नाईलाजाने जोडणी देण्यास विलंब होत आहे. तथापि दुसरी व्यवस्था करण्यासाठी दुसऱ्या लाईन उभी करुन तसेच रोहित्राची उभारणी करुन वीज जोडणी देता येईल का याची शक्यता पडताळून पाहून तसे करु असे मंचापुढे सूचित केले. मंचाने त्याना मुदतही दिली व त्या मुदतीत वि.प.ने दुसऱ्या बाजूने एलटी लाईन उभी करुन तसेच जोडणीबाबत सर्व व्यवस्था पूर्ण करुन दि.५.६.२०१० रोजी तक्रारदार ग्राहकासं जोंडणी दिलेली असल्याचे पत्र मंचात दि.२१.६.२०१० रोजी दिलेले आहे. तसेच त्या सोबत ग्राहकाने वीज जोडणी मिळाली असल्यामुळे माझी कोणत्याही प्रकारची कंपनी विरुध्द तक्रार नाही, त्याबाबतचा माझा सदरचा अर्ज गृहीत धरुन माझी तक्रार मी मागे घेत आहे असे लिहून दिलेले पत्र मंचास प्राप्त झाले आहे. त्यामुळे सदरचाअर्ज निकाली ठेवण्यात येत आहे. ग्राहकाच्या अर्जावर तारीख ५.१.२०१० अशी असल्याने व कनेक्शन दिल्याची तारीख ५.६.२०१० असल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याने ग्राहक सदस्यांनी प्रत्यक्षात ग्राहकाशी दूरध्वनीवरुन संपर्क करुन वीज जोडणी दिल्याची खात्री करुन घेतली, त्यामुळे सदर ५.१.२०१० या तारखेची नोंद नजरचुकीने झाली असल्याची खातरजमा करुन सदरचा अर्ज निकाली ठेवण्याचे मंचाने निश्चित केले आहे.

## आदेश

१) ग्राहकाने कामाची पूर्तता झाली असल्यामुळे तक्रार नसल्याबद्दलचे पत्र मंचास सादर केले आहे तसेच दि. ५.६२०१० रोजी जोडणी दिल्याचे वि.प.चे पत्र मंचास प्राप्त झाले असल्यामुळे तसेच ग्राहकाने तक्रार नसल्याबद्दल आपल्या अर्जाने कळविले असल्यामुळे सदरचा तक्रार अर्ज निकाली ठेवण्यात येत आहे.

२)	खर्चाबाबत आदेश नाही

३)	या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :